## प्रेस नोट दिनांक - १०/०५/२०१९

---

## खुनाच्या गुन्हयातील फरार आरोपी आठ वर्षानंतर गुन्हे शाखा युनिट - ३ कडुन जेरबंद

---

सहकार नगर पोलीस स्टेशन पुणे गु र नं—२५८/२०११ वि कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९, ३५२, ३२३, ५०४, ५०६ (१) मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७ (१) सह १३५ या गुन्हयामध्ये दिनांक — ०९/०७/२०११ रोजी सायंकाळी १७/४५ वा चे सुमारास डाके चौक दुगड बिल्डिंगसमोर सुखसागर नगर, कात्रज, पुणे याठिकाणी फिर्यादी प्रथमेश गजानन शृंगारपुरे रा-सुखसागर नगर कात्रज पुणे हे त्यांचा मित्र यश निंबाळकर याचेसह स्कुटीवरुन जात असताना घसरुन पडले त्यानंतर ते स्कुटी चालु करु लागले परंतु ती चालु झाली नाही. त्यावेळी तेथे उभे असलेले विकी सांळुखे व इक्बाल शेख हे हसले म्हणुन त्यांना फिर्यादी यांनी का हसता ? अशी विचारणा केली त्यावरुन त्यांची बाचाबाची झाली होती. त्याचा राग मनात धरुन आरोपींनी फिर्यादी प्रथमेश शृंगारपुरे व अभिजित प्रमोद हेंद्रे वय—१९ रा-सुखसागर धनकवडी पुणे हे गप्पा मारत उभे असताना त्यांना कोयता, लाकडी दांडके व लाथाबुंक्यानी मारहाण करुन अभिजित प्रमोद हेंद्रे याचा खुन केला व प्रथमेश शृंगारपुरे याचे खुनाचा प्रयत्न केला त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता .

सदर गुन्हयामध्ये यापुर्वी **१)बालाजी गुंडप्पा गायकवाड वय-२५ २)सोमनाथ लक्ष्मण राशिनकर वय-३२ ३)विकास शामलाल सांळुके वय-२५ ४)राजेश ऊर्फ टिकु शामलाल साळुंके वय-२९ ५)बाळा किसन वणवे वय-२६ ६)गोटया ऊर्फ गोरक्षनाथ लक्ष्मण राशिनकर वय-२२ ७) बाळु जनार्दन माने वय-२८ ८)रोहीत रामलिंग वाघीरे वय-२५ ९) पप्पु ऊर्फ निलेश किसन वणवे वय-३० १०)नितेश ऊर्फ बाळा किसन वणवे वय-२८ सर्व रा - सुखसागर नगर कात्रज पुणे** यांना अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयातील आरोपी कृष्णात लक्ष्मण राशिनकर हा गुन्हा केल्यापासुन फरार होता.

दिनांक—०९/०५/२०१९ रोजी पोहवा/ संतोष क्षीरसागर यांना त्यांचे गुप्त खब-याकडुन माहीती मिळाली की अभिजित हेंद्रे या युवकाचा खुनाच्या गुन्हयामधील फरार आरोपी कृष्णात राशिनकर हा रिक्षा चालवतो . तो शिवाजी नगर एस. टी. स्टँड पुणे या ठिकाणी येणार आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी तेथे सापळा लावुन संशयीत इसम कृष्णात लक्ष्मण राशिनकर वय — ३५ रा — प्लॅट नं २०५ कृष्णा रेसिंडन्सी न-हे गाव वेताळबाबा चौक पुणे यास ताब्यात घेतले व त्याचेकडे प्राथमिम तपास केला असता त्याने गुन्हयात सहभाग असल्याचे कबुल केले आहे. **आरोपी गुन्हयात फरार असताना आपली ओळख पटवु नये म्हणुन वेगवेगळया ठिकाणी पत्ता बदलुन राहत होता. व रिक्षाचा व्यवसाय करत होता असे निष्पन्न झाले आहे. त्यास सहकार नगर पोलीस स्टेशन पुणे यांचे ताब्यात दिले आहे.**

दिनांक — ०६/१२/२०१८ रोजी २२/१५ वा साई सबुरी चौक आंबेगाव पठार पुणे येथे मयत इसमनामे विनायक पवार वय-२३ रा — तळजाई वसाहत वनशिव वसाहत पुणे यास पुर्वीच्या भांडणाचे कारणावरुन आरोपी गणेश गायकवाड व त्याचे साथीदार यांनी छातीवर चाकुने वार करुन तसेच इतर आरोपींनी फुटलेल्या जात्याचे दगडांनी पाठीवर मारुन जिवे ठार मारले आहे. त्या गुन्हयातील संशयीत एक अल्पवयीन मुलगा यास भारती विदयपीठ पोलीस स्टेशन पुणे गु र नं — ६५७/२०१८ भा दं वि कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९ आर्म ॲक्ट कलम ४ (२५) मपो अधिनियम कलम ३७ (१) सह १३५ या गुन्हयामध्ये कारवाई होणेकामी ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. शिरीष सरदेशपांडे पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर, श्री. समीर शेख सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपक निकम व पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, किरण अडागळे आणि गुन्हे शाखा युनिट तीन पथकातील पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर, दिपक मते, विल्सन डिसुझा, अतुल साठे, संदिप राठोड, शकील शेख, दत्तात्रय गरुड , संदीप तळेकर, गजानन गाणबोटे, सुजीत पवार, यांनी केलेली आहे.